# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५
Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल** - sec.mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in , https://mahampsc.mahaonline.gov.in


## व्यवस्थापक (मोठी शासकीय मुद्रणालये), सामान्य राज्य सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक : ९५०/ ३८५१ / आठ** **जाहिरात क्रमांक : १५९ / २०१४**

**आयोगामार्फत** महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या **व्यवस्थापक (मोठी शासकीय मुद्रणालये), सामान्य राज्य सेवा, गट-अ** या संवर्गातील **सर्वसाधारण भरतीच्या २** पदाच्या भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतेची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- २**

| एकूण पदे | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित |
|---|---|---|
| २ | १ | १ |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. अपंग-२०१३/प्र.क्र.३५/अ.क.-२, दिनांक ३ जुलै, २०१३ अन्वये (अ) अंध व क्षीणदृष्टी [B & LV] व (ब) श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairment) (क) चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु [Locomotor disability or Cerebral palsy] अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत.

**२.३** मुलाखतीसाठी पाचारण केलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडू बाबतची प्रमाणपत्रे क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

**३. वेतनश्रेणी-** १५,६०० — ३९,१०० + ग्रेड पे ६,६००/-

**४. पात्रता विषयक अटी**

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वय**:- (**१**) **दिनांक १ ऑक्टोबर,२०१४** रोजी **कमाल वयोमर्यादा** ४० वर्षे (**२**) मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम (**३**) शासन आदेशानुसार माजी सैनिक व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. (**४**) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही (५) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. **परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जाईल.**

**४.३ शैक्षणिक अर्हता:-**

**I.- Candidate possess**

**(a)** A degree in Printing technology in offset printing or letterpress printing; **OR**
**(b)** A Diploma of a recognized institution in printing technology in offset printing or letterpress printing; **OR**
**(c)** A certificate of Typography (Printing) granted by any recognised institution; **OR**
**(d)** A certificate of National Apprenticeship in printing; **OR**
**(d)** A certificate of a completion of 4 years Departmental Apprenticeship; **OR**
**(f)** Any other qualification declared by Government to be equivalent to any of the above qualifications

**II.** Have a thorough knowledge of type faces, hand composition, monotype and linotype composing letterpress printing machines, different types of binding and working knowledge of various photo litho and photo engraving processes;

**OR**

Have a thorough knowledge (Theoretical and practical) of photo litho, plate making, offset printing and photo engraving with a working knowledge of letter press printing operations;

**III.** Have knowledge of industrial cost accounting and estimating

**IV.** Have knowledge of factory administration with particular reference to production scheduling, cost control and labour relations; **AND**

**४.४ अनुभव :-**

**1.** Have gained experience in a responsible position in a printing concern which in the opinion of the Commission is of a good reputation, for not less than five years, out of which at least two years should be in a managerial position after obtaining the qualifications mentioned in 4.3 (I)

**परंतुक — १)** Preference may be given to candidates who have undergone advance training in printing Technology in a foreign country

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेव्दारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क :** **८.१** अमागास - **रु.५१५/-** **८.२** मागासवर्गीय - **रु.३१५/-**

**९. अर्ज करण्याची पध्दत** -

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**९.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २६ जून २०१४** ते **दिनांक १६ जुलै, २०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**९.५** आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-
(**१**) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (**२**) नेटबँकिंग (**३**) डेबीट कार्ड (**४**) क्रेडिट कार्ड (**५**) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**९.६** mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**९.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा.

(**१**) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

(**२**) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(**३**) 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील. -(**१**)ऑनलाईन पेमेंट(**२**) नागरी सुविधा केंद्र (**३**) चलनाद्वारे

(**४**) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईल पेमेंट करु शकतील.

(**५**) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहिल.

(**६**) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(**७**) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवारा अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१०.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.** विहित पद्धतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक **१६ जुलै, २०१४ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१३.** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक **१७ जुलै, २०१४ पर्यंत** बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

ठिकाण : मुंबई
**दिनांक : २६ जून, २०१४**

**प्र. दा. अडसुळे**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग